■ वर्ष- १२ ■ अंक- ४५ ■ मुंबई, मंगळवार,२२ सप्टेंबर २०२६ ते २८ सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG|2

पायांची काळजी घेण्याच्या या टिप्स फॉलो करा

3 → येमेन पुन्हा एकदा नकाशाच्या केंद्रस्थानी

शारीरिक व्याधी, कौटुंबिक अडचणी दूर करण्याचे आमिष ← 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

के. डी. रेसिडेन्सीतील बेकायदा पार्टीवर पोलिसांचा छापा; ६५ तरुण-तरुणी ताब्यात


कल्याण। कल्याणमधील बारावे येथील नामांकित के. डी. रेसिडेन्सी हॉटेलमध्ये परवानगीविना सुरू असलेल्या कथित पार्टीवर खडकपाडा पोलिसांनी धडक कारवाई केली. पार्टी सुरू असतानाच पोलिसांनी छापा टाकत हॉटेलमधील सुमारे ६५ तरुण-तरुणींना ताब्यात घेतले. काही जण पोलिसांच्या कारवाईपूर्वी पसार झाल्याची माहिती आहे. हॉटेलमध्ये मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांचा पुरवठा होणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्याचे सांगण्यात येते. या माहितीच्या आधारे कारवाई करण्यात आली; मात्र छाप्यादरम्यान ड्रग्स किंवा अंमली पदार्थ सापडले नसल्याचे समोर आले आहे. दरम्यान, पार्टीदरम्यानचा कथित ह्यइनसाईड व्हिडीओह्लही समोर आल्याने या प्रकरणाची चर्चा आणखी रंगली आहे. परवानगीविना पाटीर्चे आयोजन नेमके कोणाच्या संमतीने झाले, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. या प्रकरणी के. डी. रेसिडेन्सीचा व्यवस्थापक उमेश शेट्टी याच्यासह सात



आयोजकांविरोधात, म्हणजेच एकूण आठ जणांवर खडकपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पार्टीच्या आयोजनामागील सूत्रधार कोण, परवानगीचे नियम का पायदळी तुडवण्यात आले आणि अंमली पदार्थांच्या पुरवठ्याबाबत मिळालेल्या माहितीचे नेमके सत्य काय, याचा तपास आता पोलिसांकडून सुरू आहे. ड्रग्स सापडले नाहीत, पण सवाल कायम! पोलिसांच्या छाप्यानंतर या पाटीर्चे आयोजन, हॉटेल व्यवस्थापनाची भूमिका आणि आयोजकांचे नेटवर्क याबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले असून, तपासातून त्याची उत्तरे समोर येण्याची अपेक्षा आहे.

ब्युटी पार्लर चालवणाऱ्या पत्नीसह 3 मुलींना संपवलं

कराड। जयपूरमध्ये एका पित्यानेजयपूरच्या करधनी परिसरात एकाने पत्नी आणि तीन मुलींची हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, शुक्रवारी पहाटेच्या सुमारास घरातील सर्वजण झोपेत असताना आरोपी राहुल झा याने दगडाने पत्नी आणि तीन मुलींवर हल्ला केला. या हल्ल्यात गीता झा, 23 वर्षीय नंदिनी, 18 वर्षीय राधिका आणि 14 वर्षीय गौरी यांचा मृत्यू झाला. गोविंद वाटिका परिसरात घडलेल्या या घटनेची माहिती शुक्रवारी सकाळी सुमारे 10 वाजता पोलिसांना मिळाली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून घराची तपासणी केली असता पहिल्या मजल्यावरील एका खोलीत गीता झा यांचा मृतदेह आढळला. त्यानंतर तळमजल्यावरील दोन वेगवेगळ्या खोल्यांमध्ये तीन मुलींचे मृतदेह आढळले. चारही जणी गाढ झोपेत असताना भंयकर हल्ला पोलिसांच्या माहितीनुसार, चारही जणी गाढ झोपेत असताना त्यांच्यावर हल्ला करण्यात आला. चारही मृतांच्या डोक्यावर आणि चेहऱ्यावर गंभीर दुखापतीच्या खुणा



आढळल्या आहेत. घटनास्थळावरून पोलिसांना एक दगडही मिळाला असून, त्याचा हल्ल्यासाठी वापर झाल्याचा संशय आहे. डीसीपी वेस्ट प्रशांत किरण यांच्या माहितीनुसार, ही घटना रात्री उशिरा घडल्याची प्राथमिक शक्यता आहे. पोलिसांकडून घटनास्थळावर मिळालेल्या पुराव्यांच्या आधारे त्या रात्रीची संपूर्ण घटनाक्रमाची वेळ निश्चित करण्याचे काम सुरू आहे. या प्रकरणात राहुल झा याच्यावर पत्नी आणि तीन मुलींच्या हत्येचा आरोप असून, तो सध्या फरार आहे.

घरी परतून वृद्ध वडिलांना चहा पाजला, अन् आरोपी निघून गेला

या घटनेनंतर पोलिसांच्या तपासात सकाळच्या वेळेतील राहुल झा याच्या हालचालींची माहितीही समोर आली आहे. पोलिसांच्या तपासानुसार, हत्या केल्यानंतरही राहुल झा याचे वर्तन सामान्य असल्याचे दिसून आले. सकाळी सुमारे 7 वाजता तो दूधवाल्याकडून दूध घेण्यासाठी गेला. त्यानंतर घरी परतून त्याने आपल्या वृद्ध वडिलांसाठी चहा बनवला आणि त्यांना चहा पाजला. त्यानंतर तो घरातून निघून गेला आणि फरार झाला. राहुल झा शेअर ट्रेडिंगचे काम करत असल्याचे तपासात समोर आले आहे. तो काही दिवसांपूर्वीच गुजरातमधून जयपूरला परतला होता. त्याची पत्नी गीता झा पहिल्या मजल्यावर ब्युटी पार्लर चालवत होत्या. मोठी मुलगी नंदिनी शिक्षणासोबत खासगी नोकरीही करत होती. पोलिसांना या प्रकरणाच्या तपासादरम्यान आणखी एक माहिती मिळाली आहे. घटनेच्या सुमारे तीन दिवस आधी राहुल झा याने शेजारी राहणाऱ्या एका महिलेकडून 25 हजार रुपये उधार घेतल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी ही माहितीही तपासाचा भाग बनवली आहे. राहुल आर्थिक अडचणीत होता का, घरात कौटुंबिक वाद होता का, शेअर ट्रेडिंगमध्ये त्याचे नुकसान झाले होते का किंवा हत्येमागे आणखी कोणते कारण होते, याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे. आर्थिक अडचण आणि कौटुंबिक वादासह विविध शक्यतांचा तपास सुरू आहे. सध्या जयपूर पोलीस राहुल झा याचा शोध घेत आहेत. हत्येमागचे नेमके कारण आणि चार जणांच्या हत्येनंतर आरोपीचे कथित सामान्य वर्तन याबाबतचे चित्र त्याच्या अटकेनंतर आणि पुढील तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

ऐन गणेशोत्सवात भीषण अपघाताचा थरार, गणपती मिरवणुकीत भरधाव कंटेनर घुसला



संभाजीनगर। राज्यभरात गणेशोत्सवाचा आनंद साजरा केला जात असताना छत्रपती संभाजीनगरध्ये अपघाताची घटना घडली आहे. गणपतीच्या मिरवणुकीत कंटेनर घुसून भीषण अपघाताची घटना घडली. या अपघातात दोन गणेश भक्तांचा मृत्यू झाला. चितेपिंपळगाव-कर्माड मार्गावरील पिंप्रिराजा गावाजवळ ही भीषण अपघातातची घटना घडली. मिरवणुकीत कंटेनर घुसल्याने दोघांचा मृत्यू झाला. या अपघातात सात वर्षाच्या चिमुकल्यासह १२ जण जखमी झाले. या गणपती मिरवणुकीत घडलेल्या घटनेने परिसरात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गणपती विसर्जनासाठी गावातून मिरवणूक काढण्यात आली होती. मिरवणूक रस्त्यावरून जात असताना अचानक कंटेनर त्यात घुसला. या धडकेत विठ्ठल रामभाऊ जाधव (49) आणि रमेश लहूजी बनसोडे (45) या दोन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. तर सात वर्षाच्या चिमुकल्यासह 12 जण जखमी झाले. जखर्मीना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं. तर काही जखर्मीवर पुढील उपचार सुरू आहेत. या दुर्घटनेत चिमुकल्यासह दोघांची प्रकृती गंभीर असल्याचे माहिती आहे. अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. गणपती आनंदाच्या वातावरणात जमलेल्या भाविकांवर अचानक दुःखाचा डोंगर कोसळलाय. मृत विठ्ठल जाधव दिवसभर शेतात काम करून घरी परतत होते. दोन शेतकऱ्यांचा अपघाती मृत्यू गावात गणपती मिरवणूक सुरू असल्याने ते रस्त्याच्या कडेला थांबून मिरवणूक पाहत होते. त्याचवेळी भरधाव कंटेनर त्यांच्या अंगावर आला आणि या दुर्घटनेत त्यांचा मृत्यू झाला. विठ्ठल जाधव यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, २२ वर्षाची मुलगी, आई-वडील आणि भाऊ असा परिवार आहे. दुसरे मृतक रमेश बनसोडे हेही शेतकरी होते. काम आटोपून घरी परतताना ते गणपतीची मिरवणूक पाहण्यासाठी थांबले होते. कंटेनर मिरवणुकीत घुसल्याने त्यांनाही गंभीर दुखापत झाली आणि त्यांचा मृत्यू झाला. अपघातातील जखर्मीपैकी काहींना प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारांसाठी घाटी रुग्णालयात रेफर करण्यात आले. जखर्मीमध्ये रमेश बनसोडे, मेहबूब पठाण, प्रकाश पाटरे आणि किशोर घुले यांचा समावेश आहे. दरम्यान, कंटेनरने मिरवणुकीत घुसल्यानंतर काही अंतरापर्यंत धडक देत पुढे गेल्याचे प्रत्यक्षदर्शीनी सांगितले. या घटनेनंतर गावात शोककळा पसरली असून गणपती आनंदावर दुःखाचे सावट आले आहे.

9 महिन्याची लेक आईच्या मायेपासून पोरकी, उल्हासनगरात हळहळ!

हुंड्यासाठी तगादा लावल्याने उचललं टोकाचं पाऊल

मुंबई। लग्न झाल्यानंतर एक मुलगी पत्नी, सून, वहिनी अशा भूमिका पार पडते. आपल्या जन्मघराला सोडून सासरी आयुष्यभर नांदते. आपलं सर्वस्व देऊनही अनेक महिलांवरील छळ काही कमी झालेले नाहीत. राज्यात नेहमीच कौटुंबिक हिसेंच्या घटना घडतात. उल्हासनगरात अशीच एक धक्कादायक घटना घडली आहे.

येथे एका 28 वर्षीय विवाहितेने कथितपणे हुंड्याच्या छळाला कंटाळून आपलं आयुष्य संपवलं आहे. विशेष म्हणजे या महिलेला अवघ्या 9 महिन्यांची मुलगी आहे. या चिमुकलीच्या डोक्यावरचे आईचे छत्र आता हरवले आहे. या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

नेमकं काय घडलं?

अवघ्या ९ महिन्यांचा चिमुकली आईच्या मायेपासून दुरावली आहे. ही धक्कादायक घटना उल्हासनगरमध्ये

माहेरून आणखी हुंडा घेऊन येण्याची मागणी करत तिचा छळ करण्यात आल्याचा आरोप नित्याच्या वडिलांनी केला आहे. तसेच मुलगी झाली म्हणून सासू माधुरी राय आणि आजी सासू शारदा राय यांनीही नित्याला त्रास दिल्याचा आरोप फियार्दीत करण्यात आला आहे.



घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार 28 वर्षीय उच्चशिक्षित विवाहितेने घरात गळफास घेऊन जीवन संपवले आहे. सासरच्या मंडळींकडून हुंड्यासाठी तगादा लावला जात होता. तसेच घरगुती कारणांवरून होत असलेल्या कथित छळाला कंटाळून तिने हे टोकाचं पाऊल उचलल्याचा आरोप तिच्या वडिलांनी केला आहे. या प्रकरणी सॉफ्टवेअर इंजिनिअर पतीसह तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पतीला पोलिसांनी अटक केली आहे.

चार लाख रुपये रोख हुंडा, संसारोपयोगी साहित्य दिले

मृत विवाहितेचं नाव नित्या राय असून डिसेंबर 2021 मध्ये तिचा विवाह उल्हासनगरातील गौरव राय याच्यासोबत झाला होता. गौरव हा सॉफ्टवेअर इंजिनिअर असून नित्या यांनी एमएससी, बीएडपर्यंत शिक्षण घेतलेले होते. लग्नावेळी नित्याच्या वडिलांनी जवळपास पावणे चार लाख रुपये रोख हुंडा, संसारोपयोगी साहित्य आणि लग्नाचा संपूर्ण खर्च केला होता, असा दावा पोलिसांत दाखल करण्यात आलेल्या फियार्दीत करण्यात आला आहे. मात्र, लग्नानंतर नित्याचा कथित छळ सुरू झाल्याचा आरोप आहे. घरातील काम व्यवस्थित करत नाही, या कारणावरून तिच्याशी वाद घातले जात होते.

9 महिन्यांच्या मुलीच्या डोक्यावरून आईचं छत्र हरपलं

त्यानंतर माहेरून आणखी हुंडा घेऊन येण्याची मागणी करत तिचा छळ करण्यात आल्याचा आरोप नित्याच्या वडिलांनी केला आहे. तसेच मुलगी झाली म्हणून सासू माधुरी राय आणि आजी सासू शारदा राय यांनीही नित्याला त्रास दिल्याचा आरोप फियार्दीत करण्यात आला आहे. या छळाला कंटाळून नित्याने घरात गळफास घेऊन आत्महत्या केली, असं तक्रारीत म्हणण्यात आलंय. या घटनेनंतर तिच्या 9 महिन्यांच्या मुलीच्या डोक्यावरून आईचं छत्र हरपलं आहे.

आरोपींना तीन दिवसांची पोलीस कोठडी

नित्याच्या वडिलांनी दिलेल्या फियार्दीवरून उल्हासनगरच्या मध्यवर्ती पोलीस ठाण्यात पती गौरव संजय राय, सासू माधुरी संजय राय आणि आजी सासू शारदा राय यांच्याविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपी पती गौरव राय याला अटक केली असून, त्याला न्यायालयात हजर करण्यात आल्यानंतर तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस आयुक्त शंकर अवताडे यांनी याबाबत माहिती दिली आहे.

नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या नावाने चक्क बनावट व्हॉट्सॲप खाते, थायलंडच्या नंबरवरुन तो मॅसेज

मुंबई । जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या नावाचा, पदाचा आणि अधिकृत फोटोचा गैरवापर करून बनावट बिझनेस व्हॉट्सॲप अकाउंट तयार करण्यात आल्याची गंभीर घटना निदर्शनास आली आहे. परदेशी क्रमांकावरून नागरिकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला जात असून, प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, काही अज्ञात व्यक्तींनी आयुष प्रसाद यांचे नाव, जिल्हाधिकारी पद आणि त्यांचा फोटो वापरून बनावट व्हॉट्सॲप बिझनेस अकाउंट उघडले आहे. या अकाउंटवरून थायलंडसारख्या परदेशी क्रमांकावरून संदेश पाठवले जात आहेत. संदेशांमध्ये "Hello… How are you doing… Where are you at the moment?" अशा स्वरूपाची सामान्य आणि अनौपचारिक चौकशी केली जात आहे. यामुळे सामान्य नागरिकांना संभ्रम होण्याची शक्यता आहे.

प्रशासनाने दिले स्पष्टीकरण



काही अज्ञात व्यक्तींनी आयुष प्रसाद यांच्या नावाने एक अकाऊंट ओपन करण्यात आले. या अकाऊंटवरुन पैशांची मागणी देखील करण्यात आली आहे.

जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे की जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या वतीने कधीही अशा प्रकारे परदेशी क्रमांकावरून संदेश पाठवले जात नाहीत. कोणत्याही अधिकृत कामासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून केवळ अधिकृत माध्यमांतूनच संपर्क साधला जातो. बनावट अकाउंटद्वारे आर्थिक फसवणूक किंवा इतर गैरप्रकारांचा प्रयत्न होऊ शकतो, अशी शक्यता नाकारता येत नाही.

या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने नाशिक जिल्ह्यातील सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की सदर परदेशी क्रमांकावरून येणाऱ्या कोणत्याही संदेशाला, कॉलला किंवा व्हॉट्सॲप संदेशाला प्रतिसाद देऊ नये.

अशा संदेशांना उत्तर देणे टाळावे आणि शक्य असल्यास संबंधित क्रमांक ब्लॉक करावा. कोणतीही संशयास्पद माहिती आढळल्यास ताबडतोब जिल्हाधिकारी कार्यालय किंवा स्थानिक पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. प्रशासनाने या प्रकरणाची गांभीयार्ने दखल घेतली असून, बनावट अकाउंट बंद करण्यासाठी संबंधित यंत्रणांकडे तक्रार नोंदवण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे कळते. नागरिकांनी सतर्क राहून अशा बनावट संपर्कांपासून स्वतःचे संरक्षण करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

ही घटना डिजिटल युगात अधिकाऱ्यांच्या ओळखीचा गैरवापर कसा होऊ शकतो, याचे उदाहरण आहे. नागरिकांनी अधिकृत माहितीसाठी नेहमी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळाचा किंवा जाहीर सूचनांचा आधार घ्यावा.

धक्कादायक, तो निर्दयी निघाला सिरियल कॅट किलर, सहा मांजरींची हत्या केल्याची दिली कबुली...



मुंबई । मांजरीला मारल्यानंतर काशीत सोन्याची मांजर दान करावी लागते अशा धार्मिक समजूती आहेत. तरीही एका निर्दयी व्यक्तीने लागोपाठ सहा मांजरींची निघृण हत्या केल्याचे उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे.

मांजरी सारख्या कोणताही उपद्रव न करणाऱ्या मुक्या प्राण्याची निदर्यीपणे हत्या केल्याच्या प्रकरणात पांजरापोळ भागातून आरसीएफ पोलिसांनी एका निदर्यी व्यक्तीला सीसीटीव्हींच्या मदतीने अटक केली आहे. मात्र, हा इसम ह्यसिरियल कॅट किलरह्ल निघाला असून त्याने ६ हून अधिक मांजरींची हत्या केल्याचे उघडकीस आले आहे. ऑगस्ट पासून या भागात एका मांजरीच्या पिल्ला सह २० मांजरींची हत्या झाल्याने खळबळ उडाली होती. आता या सिरियल मांजर किलरने सहाहून अधिक मांजरी मारल्याची कबूली दिल्याने पोलिस आणि प्राणीमित्र हैराण झाले आहेत. मांजरीसारखा शांत प्राण्याची हत्या करण्यामागे या तरुणाची नेमकी मानसिकता काय असेल याची चर्चा सुरु आहे.

या प्रकरणात शिवा नावाच्या एका बेघर सडाफटीक व्यक्तीला सीसीटीव्हींच्या मदतीने आरसीएफ पोलिसांनी अटक केली आहे. कामावाडी, पांजरापोळ आणि शनिमंदिर परिसरातील सीसीटीव्ही तपासल्यानंतर या प्रकरणात या शिवा नावाच्या व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. या संदर्भात माहिती अशी ऑगस्ट अखेर पासून या भागात २० मांजरीची हत्या झाल्याचे उघडकीस आले होते. येथील मांजरींना जेवण घालणारी कॅट फिडर रुबीना पठाण हिला एकाच रात्री सहा मांजरींना कोणीतरी चाकूने भोसकून मारुन टाकल्याचे निदर्शनास आले होते.त्यानंतर तिने पेटा इंडिया संस्थेला आणि पोलिसांना या संदर्भात तक्रार दिली होती. पोलिसांनी या प्रकरणात सर्वत्र सीसीटीव्हींचा पडताळा केल्यानंतर या शिवा नावाच्या व्यक्तीला अटक केली आहे.

पेटा इंडिया या संस्थेने या प्रकरणात या सिरियल कॅट किलिंग किंवा किलर प्रकरणात जो कोणी माहिती देईल त्याला ५० हजाराचे इनाम जाहीर केले होते. त्यानंतर आरसीएफ पोलीस ठाण्यात बीएनएसच्या कलम ३२५ आणि 'प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायदा, १९६०' च्या संबंधित कलमांनुसार एफआयआर दाखल करण्यात आला. शिवा याने या मुक प्राण्यांचा क्रूरपणे हत्या का केली, तो मानसिकदृष्ट्या अस्वस्थ आहे का, याचा शोध घेण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

सखी



डोक्याची त्वचा हायड्रेट ठेवण्यासाठी नारळाच्या दुधाचे ५ हेअर मास्क लावा

केसांमध्ये कोंडा, खाज सुटणे आणि केस गळणे यासारख्या समस्या उद्भवू लागतात. नारळाचे दूध हे एक नैसर्गिक मॉइश्चरायझर आहे आणि ते टाळूला पोषण देण्यास मदत करते. नारळाच्या दुधापासून बनवलेल्या काही हेअर मास्कबद्दल जाणून घेऊया तुमचे केस हायड्रेट ठेवण्यास मदत करतील.

नारळाचे दूध केसांसाठी का फायदेशीर आहे?

नारळाच्या दुधात लॉरिक ॲसिड, व्हिटॅमिन ई आणि इतर पोषक घटक असतात जे केसांना मजबूत आणि निरोगी बनवण्यास मदत करतात. हे टाळूला मॉइश्चरायझ करते, केस मऊ करते आणि केस तुटण्यापासून रोखते.

नारळाच्या दुधाचा हेअर मास्क कसा बनवायचा

नारळाच्या दुधाचा हेअर मास्क बनवणे खूप सोपे आहे. तुम्ही ते काही सोप्या घटकांसह घरी बनवू शकता.

साहित्य:

नारळाचे दूध, इतर घटक (जसे की दही, मध, कोरफड जेल इ.)

पद्धत:

एका भांड्यात सर्व साहित्य चांगले मिसळा. हे मिश्रण तुमच्या केसांना आणि टाळूला चांगले लावा. ३०-४५ मिनिटे तसेच राहू द्या. कोमट पाण्याने केस धुवा.

५ नारळाच्या दुधाचे केसांचे मास्क

१. **नारळाचे दूध आणि दही:**
- दह्यामध्ये लॅक्टिक ॲसिड असते जे टाळू स्वच्छ करते आणि केस मजबूत करते.

२. **नारळाचे दूध आणि मध:**
- मधामध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात जे केसांना नुकसान होण्यापासून वाचवतात.

३. **नारळाचे दूध आणि कोरफड जेल:**
- कोरफड जेल टाळूला आराम देते आणि केसांना मऊ करते.

४. **नारळाचे दूध आणि अंडे:**
- अंडे केसांना पोषण देते आणि ते चमकदार बनवते.

५. **नारळाचे दूध आणि आवळा पावडर:**
- आवळा केसांना काळे आणि मजबूत बनवतो.

नारळाच्या दुधाच्या केसांच्या मास्कचे फायदे

- टाळूला हायड्रेट करते
- केस मऊ आणि चमकदार बनवते
- केस तुटण्यापासून रोखते
- कोंडा आणि कोंडा दूर करते
- केस मजबूत बनवते

तुमचे केस निरोगी आणि मऊ करण्यासाठी नारळाचे दूध हा एक नैसर्गिक आणि प्रभावी मार्ग आहे. वर उल्लेख केलेले हेअर मास्क नियमितपणे वापरल्याने तुम्हाला चांगले परिणाम मिळतील.

पायांची काळजी घेण्याच्या या टिप्स फॉलो करा



कधी टाचांना भेगा, कधी टॅन, कोरडी त्वचा, कधी घाण... सर्व वयोगटातील महिला पायांच्या या समस्येने त्रस्त आहेत. आपल्या शरीराच्या महत्वाच्या भागांपैकी एक म्हणजे आपले पाय. सर्वप्रथम लोक आपल्या पायांकडे पाहतात. अशा परिस्थितीत, त्यांचे सुंदर आणि सादरीकरण करणे खूप महत्वाचे आहे. या लेखात असे काही उपाय दिले आहेत, ज्यांच्या मदतीने तुम्ही तुमच्या पायांची काळजी घेऊ शकता.

१. मध

मधात उपचारात्मक गुणधर्म देखील आहेत. पहिला फायदा म्हणजे मध टाचांना मॉइश्चरायझ करते आणि त्यांना मऊ देखील करते. जर तुमच्या टाचांवर जखमा असतील तर मध ते लवकर बरे करते.

कसे वापरायचे

एका टबमध्ये कोमट पाणी घ्या आणि त्यात १ टेबलस्पून मध घाला. नंतर तुमच्या टाचांना या पाण्यात ८ ते १० मिनिटे बुडवा. नंतर, तुमचे पाय टॉवेल किंवा रुमालाने पुसून टाका. जर तुम्ही या पद्धतीने नियमितपणे तुमच्या टाचांची काळजी घेतली तर ही समस्या लवकर सुटेल.

२. रात्री झोपण्यापूर्वी मालिश करा

तुमचे पाय सुंदर आणि मऊ करण्यासाठी, रात्री झोपण्यापूर्वी तुमचे पाय चांगले धुवा आणि नंतर मॉइश्चरायझिंग क्रीम वापरून काही वेळ पायांची मालिश करा. असे केल्याने माणसाला चांगली झोप तर येतेच पण पायही चमकदार बनवता येतात.

३. प्युमिक स्टोन

बदलत्या हवामानामुळे पायांची त्वचा कधीकधी खडबडीत होते. त्वचेची हरवलेली चमक परत आणण्यासाठी, पायांच्या कडक त्वचेला प्युमिक स्टोनने घासून घ्या. प्युमिक स्टोन मृत त्वचा काढून त्वचेला एक्सफोलिएट करण्याचे काम करतो.

झोपताना केस बांधून ठेवणे योग्य आहे का?



झोपताना केस कसे जागी ठेवावेत हा एक प्रश्न आहे जो अनेकदा आपल्या मनात येतो. काही लोकांना झोपताना केस उघडे ठेवणे आवडते, तर काहींना ते बांधणे आवडते. मग शेवटी बरोबर काय आहे?

उघड्या केसांचे फायदे:

आरामदायी: झोपताना उघडे केस अधिक आरामदायी असतात, कारण ते बांधलेले नसतात.

हवेचा प्रवाह: उघड्या केसांना हवेचा प्रवाह मिळतो, ज्यामुळे ते श्वास घेऊ शकतात आणि निरोगी राहतात.

केस गळणे कमी: बांधलेल्या केसांच्या तुलनेत सैल केस गळण्याची शक्यता कमी असते.

उघड्या केसांचे तोटे:

गुंतागुती: झोपताना केस गुंतागुती होणे सामान्य आहे, विशेषतः लांब केसांसाठी.

केस तुटणे: गुंतागुतीचे केस सोडवताना केस तुटू शकतात.

चेहऱ्यावरील केस: झोपताना चेहऱ्यावर मोकळे केस येऊ शकतात, ज्यामुळे झोपेत व्यत्यय येऊ शकतो.

बांधलेले केस ठेवण्याचे फायदे:

गुंता टाळणे: बांधलेले केस गुंता टाळतात, ज्यामुळे केस तुटणे कमी होते.

चेहऱ्यावर केस पडत नाहीत: बांधलेले केस चेहऱ्यावर पडत नाहीत, ज्यामुळे झोपेचा त्रास होत नाही.

स्टायलिंग: बांधलेले केस पोनीटेल, वेणी किंवा बन अशा विविध स्टाईलमध्ये बांधता येतात.

केस बांधण्याचे तोटे:

खाज सुटणे: केस बांधल्याने टाळूला खाज येऊ शकते, विशेषतः जर ते खूप घट्ट बांधले असेल तर.

केस गळणे: केस खूप घट्ट बांधल्याने केस गळण्याची शक्यता वाढते.

केस तुटणे: केस मोकळे केल्याने केस तुटू शकतात, विशेषतः जर ते खूप घट्ट बांधलेले असतील तर.

झोपताना केस उघडे ठेवणे किंवा बांधणे याचे कोणतेही बरोबर किंवा चुकीचे उत्तर नाही. हे वैयक्तिक पसंती आणि केसांच्या प्रकारावर अवलंबून असते. जर तुमचे केस लांब आणि जाड असतील तर झोपताना ते बांधून ठेवणे चांगले. जर तुमचे केस पातळ आणि लहान असतील तर तुम्ही ते उघडे ठेवू शकता.

उन्हाळ्यात केसांना घाम येणे थांबवतील घरगुती उपाय



उन्हाळ्याच्या आगमनाने, इतर अनेक समस्यांसोबतच, केसांमध्ये घाम येण्याची समस्या देखील वाढते. जेव्हा टाळूच्या घामाच्या ग्रंथी जास्त आर्द्रता निर्माण करतात तेव्हा हे घडते, बहुतेकदा आर्द्रता, उष्णता आणि ताण यामुळे. जेव्हा टाळूला घाम येतो तेव्हा खाज सुटणे, जळजळ होणे आणि अगदी कोंडा देखील होऊ शकतो.

याशिवाय डोक्यावर जास्त घाम येणे केसांवरही वाईट परिणाम करते. यामुळे केस चिकट, गोंधळलेले आणि जड होऊ शकतात. अशा परिस्थितीत, तुम्ही यापासून मुक्त होण्यासाठी काही घरगुती उपाय जाणून घेऊ या.

बटाटा

बटाट्यामध्ये पोटॅशियमचे प्रमाण जास्त असल्याने, ते टाळूतून येणारा घाम कमी करण्यास मदत करते. पोटॅशियम शरीरातील अतिरिक्त पाणी काढून टाकण्यास मदत करते, ज्यामुळे सोडियमचे परिणाम संतुलित होतात. ते वापरण्यासाठी, दररोज १० मिनिटे बटाट्याचा तुकडा तुमच्या टाळूवर घासून घ्या. यानंतर केस पाण्याने धुवा.

सफरचंद सायडर व्हिनेगर

ॲपल सायडर व्हिनेगर (ACV) मध्ये नैसर्गिक गुणधर्म आहेत जे टाळूचे कि संतुलित करण्यास आणि घाम नियंत्रित करण्यास मदत करतात. हे एक नैसर्गिक तुरट म्हणून काम करते जे बॅक्टेरिया काढून टाकण्यास मदत करते आणि टाळू निरोगी ठेवते. ते वापरण्यासाठी, काही चमचे अउत कोमट पाण्यात मिसळा आणि टाळूवर हलक्या हाताने मसाज करा. यानंतर ते ३० मिनिटे तसेच राहू द्या आणि थंड पाण्याने धुवा.

लिंबाचा रस आणि नारळ पाणी

लिंबाचा रस आणि नारळ पाणी डोक्याची त्वचा थंड ठेवते. ते वापरण्यासाठी, दोन्ही चांगले मिसळा आणि नंतर केसांना लावा. आता ते १० ते १५ मिनिटे तसेच राहू द्या आणि नंतर धुवा. लिंबाच्या रसातील व्हिटॅमिन सी आणि अँटीफंगल गुणधर्म घाम आणि सेबम नियंत्रित करतात तर नारळ पाणी केसांना ताकद आणि चमक देते. या उपायामुळे उन्हाळ्यात कोंडाही कमी होतो.

अंडी आणि दही

फेटलेली अंडी आणि दही मिसळून हळदीची पेस्ट बनवा. यानंतर ही पेस्ट टाळूवर लावा आणि ३० मिनिटे तसेच राहू द्या. यानंतर ते पाण्याने धुवा आणि नंतर सौम्य शाम्पू आणि कंडिशनर वापरा. अंड्यातील प्रथिने केसांना मऊ आणि चमकदार बनवतात, तर दह्याचे नैसर्गिक कंडिशनिंग गुणधर्म मृत त्वचेच्या पेशी काढून टाकतात आणि टाळू निरोगी ठेवतात.

आवळा बियाणे त्वचेला चमकदार बनवण्यापासून ते केसांपर्यंत सर्व गोष्टींसाठी फायदेशीर



आवळा व्हिटॅमिन सी सामग्रीसाठी प्रसिद्ध आहे. पण तुम्हाला माहित आहे का की आवळा बिया अनेक आरोग्यदायी फायद्यांनी भरलेले आहेत? आवळ्याच्या बियांमध्ये प्रथिने, फायबर, जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्ससारखे अनेक पोषक घटक असतात. या बिया विविध प्रकारे वापरता येतात, जसे की पावडर, तेल किंवा चहा म्हणून.

१. पचन सुधारते: आवळ्याच्या बियांमध्ये असलेले फायबर पचन सुधारते, बद्धकोष्ठता दूर करते आणि पोट निरोगी ठेवते.

२. रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करते: आवळ्याच्या बियांमध्ये असलेले घटक रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करतात, ज्यामुळे मधुमेही रुग्णांना फायदा होतो.

३. हृदयाचे आरोग्य सुधारते: आवळ्याच्या बियांमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स हृदयाचे आरोग्य सुधारतात, रक्तदाब नियंत्रित करतात आणि हृदयरोगांचा धोका कमी करतात.

४. रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते: आवळ्याच्या बियांमध्ये असलेले व्हिटॅमिन सी आणि इतर अँटीऑक्सिडंट्स रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात, ज्यामुळे शरीराला रोगांशी लढण्यास मदत होते.

५. त्वचेसाठी फायदेशीर: आवळ्याच्या बियांमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स त्वचा निरोगी आणि चमकदार बनवतात, मुरुमे आणि सुरकुत्या कमी करतात.

६. केसांसाठी फायदेशीर: आवळ्याच्या बियांपासून बनवलेले तेल केसांना मजबूत आणि चमकदार बनवते, केस गळती थांबवते आणि केसांना नैसर्गिक रंग देते.

७. वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत करते: आवळ्याच्या बियांमध्ये असलेले फायबर पोट भरलेले ठेवते, ज्यामुळे भूक कमी होते आणि वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते.

आवळा बियाणे कसे सेवन करावे?

१. आवळा बियाणे पावडर: आवळा बियाणे वाळवून पावडरमध्ये बारीक करता येते. ही पावडर दूध, दही किंवा मधात मिसळून खाऊ शकता.

२. आवळा बियांचे तेल: आवळा बियाण्यांपासून तेल काढता येते. हे तेल केस आणि त्वचेसाठी वापरले जाऊ शकते.

३. आवळा चहा: आवळा बिया पाण्यात उकळून चहा बनवता येतो.

आवळा बियाणे खाण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्वाचे आहे, विशेषतः जर तुम्ही कोणत्याही आजाराने ग्रस्त असाल किंवा कोणतेही औषध घेत असाल.

गर्भवती महिला आणि स्तनपान देणाऱ्या मातांनी आवळा बिया खाण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

आवळा बियाणे हा एक लपलेला खजिना आहे, जो असंख्य आरोग्यदायी फायद्यांनी भरलेला आहे. या बियांचे सेवन करून तुम्ही तुमचे आरोग्य सुधारू शकता आणि अनेक आजारांपासून दूर राहू शकता.

संपादकीय

येमेन पुन्हा एकदा नकाशाच्या केंद्रस्थानी



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



आता लाल समुद्रात संघर्ष पेटणार येमेनमध्ये सध्या घडणाऱ्या घटना चिंताजनक म्हणाव्या अशाच आहेत. तेलाच्या किमती आणि महागाई या दोन्हींचा जगभर भडका उडण्याची ताकद तेथील घडामोडींवर आहे. येमेन पुन्हा एकदा जगाच्या भूराजकीय नकाशाच्या केंद्रस्थानी आले आहे. इराणसमर्थित हुती बंडखोरांनी येमेनच्या लाल समुद्रालगतच्या किनारपट्टीवर वेगाने आगेकूच करत महत्त्वाच्या भागांवर ताबा मिळवला आहे. बाब-अल-मंदेब या जगातील अत्यंत महत्त्वाच्या सागरी मार्गाजवळ हुतींची वाढती उपस्थिती केवळ येमेनमधील यादवीची नवी पायरी नाही; ती आखाती संघषार्ची व्याप्ती वाढवणारी आणि जागतिक अर्थव्यवस्थेला हादरा देणारी घटना ठरू शकते. येमेनच्या संघर्षाकडे अनेक वर्षे स्थानिक यादवी म्हणून पाहिले गेले. परंतु आज परिस्थिती तशी राहिलेली नाही. एका बाजूला सौदी अरेबियाच्या पाठिंब्याचे येमेनचे सरकार आणि दुसऱ्या बाजूला इराणसमर्थित हुती अशी विभागणी आधीपासून होतीच. मात्र आता लाल समुद्राच्या किनाऱ्यावरील प्रभावी युद्धतंत्र यांचा प्रभावी वापर करण्याची क्षमता विकसित केली आहे. आज ते येमेनच्या मोठ्या भूभागावर प्रभाव ठेवतात आणि त्यांच्या कारवायांचा परिणाम लाल समुद्रातील आंतरराष्ट्रीय जहाज वाहतुकीवर होऊ शकतो.

अलीकडच्या आक्रमणात हुतींनी लाल समुद्राच्या किनाऱ्यावरील महत्त्वाचे बंदर आणि सामरिक बेटे ताब्यात घेतल्याचे वृत्त आहे. बाब-अल-मंदेबजवळील बेटांवरील नियंत्रणामुळे त्यांच्या सामरिक क्षमतेत आणखी भर पडली आहे. या जलमार्गावर नजर ठेवण्याची क्षमता म्हणजे व्यापारी आणि तेलवाहू जहाजांच्या वाहतुकीवर दबाव निर्माण करण्याची क्षमता. ही बाब महत्त्वाची आहे. कारण बाब-अल-मंदेब हा लाल समुद्राला एडनच्या आखाताशी जोडणारा अरुंद सागरी मार्ग आहे. पुढे याच मागार्ने जहाजे सुएझ कालव्याकडे जातात. म्हणजेच आशिया आणि युरोपदरम्यानच्या व्यापारासाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे. या मार्गात अडथळा निर्माण झाला तर जहाजांना आफ्रिकेच्या दक्षिण टोकाला वळसा घालावा लागू शकतो. त्याचा अर्थ अधिक अंतर, अधिक इंधन खर्च, अधिक विमा आणि अखेरीस वाढत्या वस्तूंच्या किमती.

सध्याच्या व्यापक इराण-अमेरिका संघर्षाच्या पार्श्वभूमीवर येमेनचे महत्त्व आणखी वाढले आहे. इराणला थेट प्रत्येक आघाडीवर युद्ध करण्याची गरज नसते; त्याच्या प्रभावक्षेत्रातील सशस्त्र गटांमार्फत विविध ठिकाणी दबाव निर्माण करणे ही त्याची दीर्घकाळची रणनीती आहे. येमेनमधील हुती ही त्या रणनीतीतील महत्त्वाची कडी ठरतात. संयुक्त राष्ट्रांच्या आकडेवारीनुसार, या ताज्या संघर्षांमुळे येमेनमध्ये हजारो लोकांना आपले घरदार सोडावे लागले असून, लाखो विस्थापित झाले आहेत. तैझ आणि आजूबाजूच्या प्रांतांमध्ये मानवी संकट बिकट बनले आहे. हुतींच्या वाढत्या प्रभावाचा सर्वांत थेट परिणाम सौदी अरेबियावर होत आहे. येमेनमध्ये अनेक वर्षे लष्करी हस्तक्षेप करूनही रियाधला हुतींना निर्णायकपणे पराभूत करता आलेले नाही. उलट आता लाल समुद्राच्या दिशेने त्यांची प्रगती झाल्याने सौदीच्या ऊर्जा आणि सुरक्षा हितसंबंधांवर थेट दबाव निर्माण झाला आहे. हुतींच्या हल्ल्यांमुळे सौदीच्या ऊर्जा पायाभूत सुविधांनाही धोका निर्माण झाला आहे. त्यांच्या पुढील हालचालींमुळे सौदीच्या तेल निर्यातीसाठी पर्यायी मार्ग कितपत सुरक्षित राहतील, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. रियाधसमोर त्यामुळे विचित्र पेच आहे. हुतींविरुद्ध अधिक आक्रमक लष्करी कारवाई केली, तर युद्ध अधिक भडकू शकते आणि संयम दाखवला, तर हुतींचे सामरिक महत्त्व वाढू शकते.

अमेरिकेसाठी सुद्धा ही परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची आहे. इराणशी सुरू असलेल्या व्यापक संघर्षाच्या पार्श्वभूमीवर येमेनमध्ये स्वतंत्र लष्करी मोहीम उघडणे म्हणजे अमेरिकन सैन्यावर आणखी ताण आणणे. सौदी अरेबियाने अमेरिकेकडे अधिक थेट मदतीची अपेक्षा व्यक्त केली असली, तरी वॉशिंग्टनसमोर ह्याकिती आत जावे?ह्ण हा मूलभूत प्रश्न आहे. अमेरिकेने हुतींविरुद्ध मोठ्या प्रमाणावर लष्करी कारवाई केली, तर थेट इराण-अमेरिका संघषार्चा विस्तार ठरू शकतो. उलट अमेरिकेने हस्तक्षेप मर्यादित ठेवला, तर सौदी आणि इतर अरब मित्र राष्ट्रांच्या सुरक्षाविषयक अपेक्षा पूर्ण न होण्याची शक्यता आहे. या संपूर्ण संकटाचा सर्वांत मोठा धोका येमेनच्या सीमेपलीकडे आहे. सागरी वाहतुकीवर परिणाम झाला की त्याची किंमत जगातील प्रत्येक अर्थव्यवस्थेला मोजावी लागते. लाल समुद्रातील अस्थिरतेमुळे जहाजांनी पूर्वीर्ही आफ्रिकेच्या केप ऑफ गुड होपमार्गे वळसा घेण्यास सुरुवात केली होती. त्यातून वाहतूक वेळ आणि खर्च वाढला. आता जर बाब-अल-मंदेबही असुरक्षित झाला, तर आधीच तणावग्रस्त जागतिक ऊर्जा बाजारावर आणखी दबाव येऊ शकतो. तेलाच्या किमती वाढल्या तर वाहतूक खर्च वाढेल; वाहतूक खर्च वाढला तर महागाई वाढेल.

भारतासाठी या घडामोडी विशेष महत्त्वाच्या आहेत. भारताचा पश्चिम आशियाशी ऊर्जा, व्यापार, समुद्री वाहतूक आणि प्रवासी भारतीय या सर्वच स्तरांवर घनिष्ठ संबंध आहे. लाल समुद्र-सुएझ मागार्तील अस्थिरता भारत-युरोप व्यापारासाठी महत्त्वाची आहे. जहाजांना लांबचा मार्ग घ्यावा लागल्यास भारतीय निर्यातदार आणि आयातदारांच्या खर्चावर त्याचा परिणाम होऊ शकतो. यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे भारताची सागरी सुरक्षा ही आता केवळ भारतीय समुद्रकिनाऱ्यापुरती मर्यादित राहिलेली नाही. अरबी समुद्र, एडनचा आखात, लाल समुद्र, बाब-अल-मंदेब आणि सुएझ या संपूर्ण साखळीतील स्थैर्य भारताच्या आर्थिक सुरक्षेशी जोडले गेले आहे. भारताने त्यामुळे पश्चिम आशियातील संघषार्कडे केवळ राजनैतिक प्रश्न म्हणून पाहण्याऐवजी ऊर्जा सुरक्षा, व्यापार सुरक्षा आणि समुद्री सुरक्षा या तिन्ही अंगांनी पाहण्याची गरज आहे.

आज प्रश्न केवळ येमेनमध्ये कोण जिंकणार, एवढाच नाही. प्रश्न आहे की, लाल समुद्र किती सुरक्षित राहणार? बाब-अल-मंदेब किती काळ मुक्त राहणार? सौदी अरेबिया किती दूरपर्यंत संघर्षात उतरणार? अमेरिका किती हस्तक्षेप करणार? आणि इराण आपल्या प्रभावक्षेत्राचा वापर किती आक्रमकपणे करणार? या प्रश्नांची उत्तरे पुढील काही आठवड्यांत पश्चिम आशियातील संघषार्ची दिशा ठरवतील. त्यामुळे येमेनकडे दुर्लक्ष करणे म्हणजे जागतिक व्यापाराच्या एका अत्यंत महत्त्वाच्या नाडीकडे दुर्लक्ष करणे होय.

युद्धाच्या मैदानातून कधीही स्थायी शांतता प्रस्थापित होऊ शकत नाही. युद्धाच्या रणांगणात भूभाग जिंकला जातो; पण भूराजकारणात मार्ग जिंकला की प्रभाव मिळतो. जागतिक सागरी व्यवस्थेची आणि पश्चिम आशियातील नव्या सामरिक समीकरणाची परीक्षा आहे.

भारतातील सर्वात मोठा प्रकल्प रायगडमध्ये, माझगाव डॉकची २७ हजार कोटींची गुंतवणूक



रायगड जिल्ह्यात भारतातील सर्वात मोठा जहाजबांधणी प्रकल्प उभारला जाणार आहे. दिघी बंदरात नवीन ग्रीनफील्ड जहाजबांधणी क्लस्टर उभारण्यासाठी सुमारे २७,००० कोटींची गुंतवणूक माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेडतर्फे केली जाणार आहे. या निर्णयामुळे ९० हजार रोजगार निर्माण होण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र सरकारने मंगळवारी दिलेल्या माहितीनुसार, संरक्षण क्षेत्रातील सार्वजनिक उपक्रम असलेल्या माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड (एमडीएल) आणि नॅशनल शिपबिल्डिंग अँड हेवी इंडस्ट्रीज पार्क महाराष्ट्र लिमिटेडसोबत सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपस्थित होते.

या प्रकल्पामुळे दिघी येथे दरवर्षी किमान २० लाख ग्रॉस टन क्षमतेचे जहाजबांधणीचे उद्दिष्ट ठेवले आहे. २७ हजार कोटी कोटींच्या प्रस्तावित गुंतवणुकीसह हा प्रकल्प मोठ्या व्यावसायिक जहाजांच्या बांधणीस सक्षम करेल आणि देशाच्या सागरी औद्योगिक क्षमतेला बळ मिळणार आहे. हे ग्रीनफील्ड जहाजबांधणी क्लस्टर महाराष्ट्र मेरीटाइम बोर्ड आणि मुंबई पोर्ट अथॉरिटी द्वारे या प्रकल्पासाठी स्थापन करण्यात आलेल्या एनएसएचआयपीएलएल या विशेष उद्देश कंपनीच्या माध्यमातून संयुक्तपणे विकसित केले जात आहे. हा उपक्रम केंद्राच्या 'ग्रीनफील्ड शिपबिल्डिंग क्लस्टर डेव्हलपमेंट प्लॅन' अंतर्गत पुढे नेला जात असून ह्यमेरीटाइम अमृत काल व्हिजन २०४७ह्णच्या उद्दिष्टांना पूरक ठरेल अशी अपेक्षा आहे.

दिघी प्रकल्पामुळे आधुनिक जहाजबांधणी पायाभूत सुविधा आणि या क्षेत्राला पाठिंबा देणारी औद्योगिक व पुरवठा साखळी परिसंस्था तयार होईल. यामुळे देशांतर्गत जहाजबांधणी क्षमतेला चालना मिळणे, तंत्रज्ञान आणि गुंतवणूक आकर्षित होणे, कुशल रोजगार निर्माण होणे आणि जागतिक सागरी क्षेत्रात भारताची स्पर्धात्मकता वाढणे अपेक्षित आहे.

देशाच्या सागरी विकास योजनांखाली अपेक्षित असलेल्या एकूण जहाजबांधणी क्षमतेपैकी सुमारे ४० टक्के क्षमता एकट्या महाराष्ट्रात निर्माण करण्यासाठी हा प्रकल्प मदत करेल, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

कोकण आणि महाराष्ट्रासाठी हा खूप मोठा करार आहे, असे सांगत फडणवीस यांनी या प्रकल्पासाठी विशेष प्रयत्न केल्याबद्दल बंदर विकास मंत्री आणि मंत्रिमंडळातील सहकारी नितेश राणे यांचे अभिनंदन केले.

सर्व आवश्यक परवानग्या मिळाल्यानंतर या गोदीचे काम सुरू होईल आणि प्रकल्प पूर्ण होण्यासाठी सुमारे तीन वर्षांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

एमडीएलचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक कॅप्टन जगमोहन यांनी सांगितले की, सर्व भागधारकांच्या सहकार्याने कंपनी दिघी येथे आधुनिक आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक अशी जहाजबांधणी सुविधा निर्माण करण्यासाठी काम करेल.

कॅप्टन जगमोहन यांनी 'एनएसएचआयपीएमएल'चे व्यवस्थापकीय संचालक प्रदीप पी. यांच्यासोबत सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

याप्रसंगी मत्स्यव्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे, बंदरे आणि परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, बिझनेस डेव्हलपमेंटचे सरव्यवस्थापक संजयकुमार सिंह, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी उपस्थित होते.

वसई-विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)

मुख्य कार्यालय विरार

दुरध्वनी क्र. १२२५० - २४०२१७९ / २४०२५६३

जावक क्र. :- व.वि.श.म./क.वि./२०५२//२६-२७

दिनांक :- १८/०९/२०२६

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहीर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	विभाग	मालमत्ता क्रमांक.	रिसीट नं	ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-या किंवा करदात्याचे नाव	खरिददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव
१	आचोळे-१४	NL२३/१४०/१९	२३३९७	विनोद आर गुप्ता	इम्तियाज रमेश शेख/शाहिना इम्तियाज शेख
२	आचोळे-११	NL२०/४३/६७	२३१८३	दुडालाल जेसिंग सुमरा	अमित श्रीकांत सुर्वे
३	आचोळे-११	NL२०/५६/१६	२३६८६	वैशाली बी बोरसे	ममता नरेंद्र सिंह
४	आचोळे-११	NL२०/३०/९	२४२६१	सतिश रामप्रसाद मोर्या	कुलदिप रामशंकर यादव/संदीप यादव/ रामशंकर यादव
५	आचोळे-१४	NL२३/३४/४१	३५४४५	जितेंद्र परमानंद मेहता/पारुल मेहता	पारुल जितेंद्र मेहता
६	आचोळे-१४	NL२३/५३/५४	३५५२६	अंजना बिल्डर्स	आशिष शिवप्रसाद भट्ट व छाया आशिष भट्ट
७	आचोळे-१४	NL२३/११४/८	३५५२२	जेठाभाई वाघेला व इतर	हरेश अरखाभाई प्रजापती व चेतना प्रजापती
८	आचोळे-१४	NL२३/१३९/२७	३५४४६	इलियास इस्माईल हाण	गुलजार फैयाजुद्दीन अन्सारी व इतर
९	आचोळे-१४	NL२३/३८/७८	३९५४०	बी. व्ही. वाघेला	हिमांसु भवनभाई वाघेला
१०	आचोळे-१४	NL२३/३७/९६	३५४५९	हर्षद कांतीलाल दोशी/गिता दोशी	विनीत विठ्ठल तांडलकर
११	आचोळे-१३	NL२२/२८/३	३४६७७	राजीव सत्यनारायण सिंह	रिता विजयप्रताप यादव व विजयप्रताप रामबरण यादव
१२	आचोळे-१३	NL२२/६६/४	३४८२७	इमरान मो. हनिफ मन्सुरी	समीजा खातुन अक्राम शेख
१३	आचोळे-१४	NL२३/६६/४	३५५१५	नफिशा युसुफ दागिनावाला	अली अकबर मोहम्मद लायहरवाला
१४	आचोळे-१४	NL२३/९२/३५	३५५२१	दिलीप विश्वकर्मा	छाया जोगेश गुप्ता व जोगेश रामकरण गुप्ता
१५	आचोळे-१४	NL२३/१४०/५७	३५७३८	अश्विनी अशोक होवळे	आरुणी रुपेश लोके
१६	आचोळे-१३	NL२२/७२/६७	३५८१३	राजेश हरिश्चंद्र बडबे	खुर्शीद मारुकी व मुझरीन खुर्शीद फारुकी
१७	आचोळे-१३	NL२२/७२/५४	३५७४२	नारायण सिंदा वाघेला/शारदा वाघेला	मोहम्मद मसूम आलव व खुशनमा खातून
१८	आचोळे-१४	NL२३/४९/४९	३५७४५	अष्टविनायक बिल्डर्स	तौहीद नासीर खान व नुसरत रशीद शेख
१९	आचोळे-११	NL२०/७४/३	३५४६१	बलवंत अहिरे	भरत चुनीलाल मेवाडा व हरिश मेवाडा
२०	आचोळे-१३	NL२२/७०/६	४६७६३	विजय निवृत्ती निकम/शितल निकम	शितल विजय निकम

सही

(बुधाजी शेळके)

प्र. कर अधिक्षक

प्रभाग समिती (ई) नालासोपारा

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार,२२ सप्टेंबर २०२६ ते २८ सप्टेंबर २०२६

भारतीय तटरक्षक दलाची मोठी कारवाई, लाखोंचा मुद्देमाल जप्त

मुंबईजवळ तस्करांचे जहाज पकडले



नवी दिल्ली। अरबी समुद्रातून मुंबईच्या किनाऱ्यावर होणाऱ्या तस्करीला भारतीय तटरक्षक दलाने मोठा दणका दिला आहे. मुंबईच्या किनाऱ्यापासून काही अंतरावर बेकायदेशीररित्या डिझेल आणि दारूची तस्करी करणाऱ्या एका संशयित जहाजाला कोस्ट गार्डने मध्यरात्री सापळा रचून पकडले आहे. या कारवाईत सुमारे 10 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. 10 सप्टेंबर रोजी दुपारी 2 वाजून 10 मिनिटांनी कोस्ट गार्डला एका ऑफशोअर ऑईल रिगजवळ विनापरवाना संशयास्पद हालचाली होत असल्याची पक्की गुप्तचर माहिती मिळाली. माहिती मिळताच तटरक्षक दलाने क्षणाचाही विलंब न लावता आपले अत्याधुनिक ऑफशोअर पेट्रोल व्हेसल तातडीने त्या दिशेने वळवले. रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन तस्कर पळून जाण्याच्या प्रयत्नात होते, मात्र कोस्ट गार्डच्या जवानांनी टॅक्टिकल प्लॅनने त्या जहाजाला घेरले आणि. जहाजाची कसून झडती घेतली असता त्यात लपवून ठेवलेली बेकायदेशीर विदेशी दारू आणि हिशोब नसलेली तब्बल 10 लाख रुपयांची रोख रक्कम आढळून आली. प्राथमिक तपासात हे जहाज बेकायदेशीर डिझेल तस्करीत गुंतले असल्याचा संशय आहे. कोस्ट गार्डने जहाजासह त्यावरील 6 क्रू मेंबर्सना ताब्यात घेऊन मुंबई हार्बरमध्ये आणले आहे. जहाज आणि आरोपींना पुढील तपासासाठी संबंधित यंत्रणांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या तस्करीमागे मोठे आंतरराष्ट्रीय रॅकेट असण्याची शक्यता असून पोलीस, कस्टम आणि इतर समुद्री सुरक्षा यंत्रणांसह संयुक्त तपास सुरू करण्यात आला आहे.

शारीरिक व्याधी, कौटुंबिक अडचणी दूर करण्याचे आमिष

मृत्यूची भीती दाखवून 45 हजारांची फसवणूक

मुंबई। मृत्यूची भीती दाखवून पूजा आणि जादूटोण्याच्या नावाखाली पैसे उकळल्याचा आरोपाखाली पुण्यात मोनाली आई विधाते हिच्यासह पाच जणांविरोधात बिबवेवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल केलाय. कौटुंबिक अडचणी दूर करण्यासह शारीरिक व्याधी कमी करण्याचे आश्वासन देत ही महिला लोकांकडून पैसे उकळत होती. गुन्हा दाखल झालेल्या लोकांची नावं मोनाली विधाते, कृष्णा विधाते, मोनालीचा भाऊ मयुर, अशोक बनकर आणि मंजु कौर अशी आहेत. सोलापूर जिल्ह्यातील टेंभुर्णी इथल्या 47 वर्षीय व्यक्तीने त्याच्यासोबत फसवणूक झाल्याची तक्रार पोलिसांकडे केली. पोलिसात केलेल्या तक्रारीनुसार डिसेंबर 2025 ते 1 सप्टेंबर 2026 या दरम्यान त्याच्यासोबत फसवणूक झाली. सुखसागरनगर इथल्या मोनाली विधाते हिच्या घरीही पीडित व्यक्तीला बोलावण्यात आल्याचे त्याने पोलिसांना सांगितलं. पोलिसांच्या माहितीनुसार मोनाली विधाते हिने फेसबुकवर ह्यगुरुवर्य मोनाली आई विधातेह्न या नावाने अकाऊंट उघडले आहेत. त्यात कौटुंबिक अडचणी सोडविणे आणि देवी-देवतांशी संबंधित विविध व्हिडीओ शेअर करुन ती लोकांची फसवणूक करत होती. तक्रारदाराला शारीरिक व्याधी आणि कौटुंबिक अडचणी दूर करण्याच्या नावाखाली हळदी-कुंकू, दोरा आणि बाहुली पाठवून ती लोकांची हजारोंची फसवणूक करत होती. ती पीडित लोकांना आपल्या घरी बोलावून त्यांच्या अडचणींचे कारण सांगताना मृत्यूची भीती दाखवण्यात त्यांची फसवणूक करत होती. तक्रारीनुसार, मोनाली विधाते आणि अशोक बनकर यांनी भेटण्यासाठी पैसे घेतले होते. तक्रारीनुसार 3100 आणि 300 रुपये घेतले होते. तसंच कथित जादूटोणा साहित्य आणि दोन वेळा उतारे करण्याच्या नावाखाली या महिलेने पीडित करुन 21 हजार आणि ऑनलाइन 21 हजार अशी एकूण 45 हजार 400 रुपयांची रक्कम उकळलं आहेत. पीडितने सांगितलं की, शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली होती. तसंच मृत्यूची भीती दाखवून पैसे घेण्यात आल्याचे तक्रारदाराने पोलिसांना सांगितलं आहे. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तक्रारदाराने बिबवेवाडी पोलीस ठाण्यात त्याच्यासोबत झालेल्या गोष्टीबद्दल सांगितलं. त्यानंतर मोनाली विधाते आणि इतर चौघांविरोधात गुन्हा दाखल करुन या प्रकरणाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक अश्विनी सातपुते हे करत आहेत.



पुण्यात महिला भोंदूबाबा मोनाली आई विधाते हिचा काळा धंडा उघड झाला आहे. शारीरिक व्याधी, कौटुंबिक अडचणी दूर करणार अगदी मृत्यूची भीती दाखवून 45 हजारांची फसवणूक केल्याची तक्रार समोर आली आहे.

एफडीएची मोठी कारवाई... बनावट पनीर आणि अस्वच्छतेमुळे अन्नसेवा बंद अन् परवाना रद्द

छत्रपती संभाजीनगर। राज्यभरात राबवल्या जाणाऱ्या 'सुरक्षित अन्न' मोहिमेअंतर्गत अन्न व औषध प्रशासनाने वाळूज एमआयडीसी परिसरातील एका नामांकित हॉटेलवर कडक कारवाई केली आहे. वडगाव कोल्हाटी येथील 'हॉटेल मनी प्लांट'मध्ये मिळणारे पनीर असुरक्षित आणि आरोग्यास घातक असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर, तसेच स्वयंपाकघरात तीव्र अस्वच्छता आढळून आल्यामुळे प्रशासनाने या हॉटेलचा अन्न परवाना तात्काळ प्रभावाने निलंबित केला आहे. अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी हॉटेलमधून घेतलेल्या पनीरच्या नमुन्यांची प्रयोगशाळेत सखोल तपासणी केली असता, त्यामध्ये दुग्धजन्य स्निग्धांशाचे (दूध फॅट) प्रमाण आवश्यक मानकापेक्षा अत्यंत कमी आढळले. त्याऐवजी मानवी आरोग्याला अपायकारक असणाऱ्या 'वनस्पतीजन्य चरबीची' (व्हिजिटेबल फॅट) गंभीर भेसळ करण्यात आल्याचे सिद्ध झाले. यामुळे अन्न विश्लेषकांनी हे पनीर खाण्यासाठी अत्यंत 'असुरक्षित' घोषित केले आहे. केवळ भेसळयुक्त पनीरच नाही, तर प्रत्यक्ष पाहणीदरम्यान हॉटेलच्या स्वयंपाकघरात कीटकांचा वावर, कचरा व्यवस्थापनाचा अभाव, पाण्याच्या दर्जाची चाचणी न करणे आणि अन्न तयार करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय दाखल्यांची अनुपस्थिती अशा अनेक गंभीर त्रुटी आढळून आल्या. याप्रकरणी प्रशासनाने बजावलेल्या नोटीसला हॉटेल चालकाने निर्धारित वेळेत कोणतेही स्पष्टीकरण दिले नाही.

पुण्यातील १० दिवसांची दारूबंदी रद्द

उच्च न्यायालयाच्या दणक्यानंतर गणेशोत्सवात केवळ दोनच दिवस

मुंबई। पुणे प्रशासनाने गणेशोत्सवाच्या १० दिवसांत लागू केलेली दारूबंदी मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी अत्यंत कठोर शब्दांत फेटाळून लावली. मुंबईसह इतर जिल्ह्यांना वगळून केवळ पुण्यालाच का लक्ष्य केले जात आहे, असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला. कोर्टाच्या या तीव्र भूमिकेनंतर पुणे जिल्हा प्रशासनाने नमते घेत १० दिवसांचा दारूबंदीचा आदेश मागे घेतला असून, हा नियम आता केवळ दोन दिवसांपुरता मर्यादित ठेवण्यात आला आहे.

मुख्य न्यायाधीश एम. सी. त्रिपाठी आणि न्या. अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने सकाळीच स्पष्ट केले होते की, प्रशासनाने हा अयोग्य आणि मनमानी आदेश मागे न घेतल्यास न्यायालय स्वतः हस्तक्षेप करेल. अशा प्रकारच्या सरसकट बंदीमुळे पुण्याची आणि पुणेकरांची प्रतिमा विनाकारण मलिन होते, असे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले.

सुधारित आदेश

त्यानंतर झालेल्या सुनावणीदरम्यान अतिरिक्त सरकारी वकील केदार डिगे यांनी न्यायालयाला माहिती दिली की, आता दारूबंदीचा नियम फक्त १४ सप्टेंबर रोजी (उत्सवाचा पहिला दिवस) दुपारी ४ वाजेपर्यंत आणि उत्सवाच्या शेवटच्या दिवशी (२५ सप्टेंबर - जो आधीच ड्राय डे आहे) लागू राहील. न्यायालयाने हा बदल स्वीकारत पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने यासंदर्भात नवीन सुधारित आदेश जारी करण्याचे निर्देश दिले.

पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी गणेशोत्सवाच्या संपूर्ण १० दिवसांसाठी दारू विक्रीवर बंदी घालण्याचा आदेश जारी केला होता. याविरोधात हॉटेल व्यावसायिक आणि वाईन शॉप असोसिएशनने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

प्रशासनाला कडक ताशेरे

संपूर्ण महाराष्ट्रात केवळ पुण्याचीच निवड करण्यामागे काय तर्क आहे, पुणे हे अतिशय सुसंस्कृत आणि सुशिक्षित शहर आहे. केवळ पुण्यातच लोक दारू पिऊन गैरवर्तन करतात, असा संदेश प्रशासनाला द्यायचा आहे का, कायदा व सुव्यवस्था राखणे आणि उपद्रव रोखणे महत्त्वाचे असले, तरी कायदेशीर परवानाधारकांचा व्यवसाय १० दिवस सरसकट बंद ठेवण्याचा आदेश दिला जाऊ शकत नाही, असे कोर्टाने स्पष्ट केले. दारू पिणारी प्रत्येक व्यक्ती उपद्रव करतेच असे नाही. अशा प्रकारच्या संपूर्ण बंदीमुळे राज्य उत्पादन शुल्क विभागाचेही मोठे महसुली नुकसान होते, असे खंडपीठाने नमूद केले.

कोर्टाच्या या निर्णयानंतर पुण्यातील हॉटेल व्यावसायिक आणि दारू विक्रेत्यांना मोठा दिलासा मिळाला असून सुधारित आदेश लागू करण्यात येत आहेत.



काळीज पिळटवून टाकणारी घटना...

भीषण आगीत एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू

बेळगाव। देशभरात गणरायाच्या आगमनाचा उत्साह आणि भक्तिमय वातावरण सर्वत्र आहे. गणेश चतुर्थीच्याच रात्री मात्र एक दुर्दैवी अपघात झाला. बेळगावमधील चव्हाट गल्लीत काळीज पिळवटून टाकणारी घटनी घडली. एका दुकानाला आणि घराला भीषण आग लागली. या भीषण आगीत कुटुंबातील चार जणांचा जागीच होरपळून दुदैर्वी अंत झाला. आणखी दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत.

एका स्थानिक वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, मध्यरात्रीच्या सुमारास दमोने यांच्या घरातून अचानक आगीच्या तीव्र ज्वाळा बाहेर पडत होत्या. काही क्षणांतच होत्याचे नव्हते झाले. आगीने संपूर्ण घराला वेढा घातल्याचे पाहायला मिळाले. घरामधील लोकांना बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही. या दुर्दैवी दुर्घटनेत गजानन दमोने (६५), शारदा दमोने (४५), भारती दमोने (५०) आणि रोशन दमोने (२१) या चौघांचा दुदैर्वी मृत्यू झाला. तर प्रिया दमोने (२८) आणि गंगा दमोने (२५) या दोघी गंभीर जखमी झाल्या आहेत, या दोघींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



घरातील फ्रिजचा अचानक स्फोट झाल्यामुळे ही आग लागली असावी अशी प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. आगीने क्षणातच रौद्ररूप धारण केले. ज्यामुळे सर्व जळून खाक झाले. मजुरी करून हे कुटुंबाचा आपला उदरनिर्वाह करत असे. या कुटुंबासोबत झालेल्या या घटनेमुळे संपूर्ण चव्हाट गल्ली परिसर सुन्न झाला आहे. ही दुर्घटना मार्केट पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे, पोलिस आणि अग्निशामक दलाने घटनास्थळी लगेच धाव घेतली होती आणि आग आटोक्यात आणली. आगीचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलिसांकडून पुढील आणखी तपास सुरु आहे.

सर्वत्र सणाचा उत्साह असताना मागील एक ते दोन दिवस अशा दुदैर्वी घटना घडताना दिसत आहे. अनेक चाकरमानी मुंबईन कोकणाच्या दिशेने रवाना झाले होते. या काळात काही गाड्यांचा भीषण अपघात झाल्याची माहिती मागील एक ते दोन दिवसांत समोर आल्या आहेत. सणासमारंभात अशा दुदैर्वी घटना घडल्यामुळे त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (बी) विरार पूर्व

मुख्य कार्यालय - विरार

दुरध्वनी - ९५२५०-२४०२१७९/२४०३४४२/२४०२५६३

जावक क्र. वविशम /कर/१०७४/२०२६-२७

दिनांक - १६/०९/२०२६

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकाच्या प्रकरण परत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भात कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय विभागीय कार्यालय विरार येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यतः करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी या बाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	मालमत्ता क्र.	पावती क्र.	ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-याचे नाव किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव	खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन नाव
1	VR06/1940/26	37208	योगेश सिताराम मोरे	शांताराम गोपाळ हाताणकर/ प्रणव शांताराम हातणकर
2	VR08/168/82	34306	नेहा भरत छतबार	प्रशांत कृष्णा बामणे / प्राची प्रशांत बामणे
3	VR08/126/375	34990	सुजित राधेश्याम सिंह/ आभा सिंह	विनोद कुमार तिवारी/ रत्नेश विनोद तिवारी/ राणीदेवी विनोद कुमार तिवारी
4	VR08/97/11	34993	ईशिता अर्जुन बादरे	भालचंद्र विनायक पाटील/ ज्योती भालचंद्र पाटील
5	VR08/104/92	34982	दिनेश दौलत गोताड	अर्चना दिनेश यादव
6	VR08/73/27	35292	मधुकर सखाराम पारधी	दिनेश धोंडुराम बागवे
7	VR08/168/28	35290	सर्वश्री व्ही एम एस इंटरप्राइजेस	कनिष्का कुंदन संखे/ कुंदन मधुकर संखे
8	VR08/56/33	36878	सुदर्शन सुर्यकांत पांचाळ/ प्रज्ञा सुदर्शन पांचाळ	वैष्णवी उमेश आग्रे/ उमेश पुनाजी आग्रे
9	VR08/171/49	36756	सुनंदा प्रदीप जाधव/ प्रदीप पांडुरंग जाधव	सर्वेश श्रीधर जाधव/ श्वेता श्रीधर जाधव
10	VR08/47/104	37014	परमेश्वर संपतराव कोळी	जगन्नाथ दिलीप कसालकर
11	VR08/152/16	35893	राजेश पी दळवी	प्रदिप परशुराम केंबले/ प्रगती प्रदिप केंबले
12	VR08/168/188	37015	आशिष कुमार गुप्ता	अचलाराम उदारामजी परिहार/रेखा अचलाराम परीहार
13	VR08/99/14	34041	विश्वनाथ भाउ पाष्टे	सुरेंद्र शंकर वाडेकर/ज्ञानिया सुरेंद्र वाडेकर
14	VR08/85/8	37422	चंद्रकांत शंकर शिंगाडे	रुपाली चंद्रकांत शिंगाडे
15	VR08/111/36	37424	मिनाक्षी बळीराम शेटये	सुमीत सुरेश भुवड/ स्वप्नाली सुमीत भुवड
16	VR08/190/85	37432	अमन श्रवण यादव	मयूर हरिश्चंद्र गुरव /स्वप्नाली मयुर गुरव
17	VR08/139/18	37117	कृष्णा जगन्नाथ यादव	प्रणव सुरेश घाणेकर
18	VR08/49/36	37179	निशा प्रशांत मेस्त्री / प्रशांत प्रकाश मेस्त्री	सावि सिध्दांत फणसे/ सिध्दांत सुरेश फणसे
19	VR08/35/50	37177	पी. पी. मोरे	वैभव प्रभाकर मोरे
20	VR08/189/128	38107	त्रिप्ता पांडे	सुनिता अजय पाटील/ युगा सुशांत महाळे

सही /-

सहा. आयुक्त

प्रभाग समिती (बी) विरार पुर्व

वसई-विरार शहर महानगरपालिका

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com